**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०७**
**मा.स्थायी समिती सभेची नोटीस (ऑनलाईन झुम ॲप द्वारे)**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १६ /०९/२०२१

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ०७ सोमवार दिनांक २०/०९/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपसचिव , महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत.

तरी सदर सभेत आपण ऑनलाईन सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**सोमवार दिनांक - २०/०९/२०२१ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ९६ | कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ९७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हापरिषद शाळेपर्यत डी.पी.रोडच्या कडेने ४५० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे व बोल्हेगांव बिरोबा मंदिर ते सिना नदी दरम्यान ४५० व ९०० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९८ | शिकाउ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आय टी आय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९९ | अहमदनगर महानगरपालकेच्या शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी श्री.शेख आफाक शेख अजीज व इतर १० यांची मानधनावर नेमणूक करणेस मुदतवाढ मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १०० | अहमदनगर शहार पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले श्री.अमृता भाउ सरोदे व्हॉलमन मदतनिस यांची नव्याने तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक करणे व श्री.वामन बाळकृष्ण नामदेव यांना मुदतवाढ देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १०१ | कोविड - १९ लसीकरणा करीता म.न.पा.आरोग्य केंद्र येथे मंडप ,बॅरीकेट,खुर्ची व टेबल यांची व्यवस्था करणे,मायक्रो कंटेनमेंट झोन मध्ये बॅरेकेटींग करणे इत्यादी कामाकरीता निविदेपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

PTO

| | |
|---|---|
| १०२ | अर्जदार मालमत्ता धारक श्री.किशोर दत्तात्रय काळे रा.आयोध्या नगर,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१ सावेडी वॉर्ड क्र.८७ बील क्र.z१७८०७२३४० (७८-२६९) वरील नळजोड नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १०३ | अर्जदार मालमत्ता धारक श्री अशोक वामन पाटेकर रा.पाईल लाईन हडको वसाहत,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१,वॉर्ड क्र.६२ बिल क्र.z १६२०६५५९२(६२-२५२) वरील दुबार आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

**टिप** :- १] प्रत्येक सदस्यांने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरून Zoom App डाउनलोड करून घ्यावे.

२] Zoom App द्वारे प्रत्येक सदस्यांना मा.स्थायी समिती सभेस उपस्थित राहता येईल.

३] मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकासविभाग यांचेकडील दि. २८ जून २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

सही /-
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्रमांक- ९६ ते १०३ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०७**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक - ९६** **सोमवार दि. २०/०९/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,बा.दे दवा यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बा दे दवा ३०७ दि.०७/०८/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैदयकीय अधिकारी यापदी डॉ.रेणूका प्रणव जोशी यांचा अटी व शर्ती नुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.२६/०१/२०२१ ते २५/०७/२०२१ अखेर असुन सदरची मुदत हि दि.२६/०७/२०२१ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवून दि.२९/०७/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मनधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत " सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.२६ दि.०३/०६/२०२१ च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था करारबध्द नेमणूक १०९०दि.२१/०६/२०२१ अन्वये कै.बा. दे. दवा. करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणूका प्रणव जोशी यांची रू.२८,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.२६/०१/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरची मुदत ही दि.२६/०७/२०२१ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेवाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणूका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक २९/०७/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती् प्रमाणे रूपये २८,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मा.आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय घेणे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्रय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एस.आर .व्ही.२००५ /प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमांमार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.असे नमुद केले आहे.

प्रस्तावित वैद्यकीय अधिकारी यापदी पुढील मुदतवाढ देतांना उपरोक्त शासन परिपत्रकान्ये अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) प्रस्तवीत अ व मुलेप यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**<u>ऑनलाईन VC चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणुका प्रणव जोशी यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर घेणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेवाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणूका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक २९/०७/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती् प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>** :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेवाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.रेणूका प्रणव जोशी यांना दिनांक २९/०७/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती् प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०७**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक - ९७** **सोमवार दि. २०/०९/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हापरिषद शाळेपर्यंत डी.पी.रोडच्या कडेने ४५० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे व बोल्हेगांव बिरोबा मंदिर ते सिना नदी दरम्यान ४५० व ९०० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकुर :- अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

प्रशासकीय मान्यतेकरिता

कामाचे नाव- अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत डी.पी. रोडच्या कडेने ४५० एमएम व्यासाची पाईप गटर करणे व बोल्हेगांव बिरोबा मंदिर ते सिना नदी दरम्यान ४५० व ९०० एमएम व्यासाची पाईप गटर करणे

१] विषयांकित काम मा.महापौर सौ. रोहिणी संजय शेंडगे यांची दि.१३/०७/२०२१ रोजी पत्रानुसार कमाची मागणी केलेली आहे. नुसार सन २०२१-२०२२ मधील "विकासभार निधीतून खर्च" या लेखाशिर्षका अंतर्गत सदर काम प्रस्तावीत करण्यात यावे असे सुचविले आहे.

२] सदर कामाची अंदाजपत्रकीय तरतुद खालील प्रमाणे आहे.

लेखाशिर्षक :-"विकासभार निधितुन खर्च २०२१-२२ रजि.नं.पान नं.१२७ अ.क्र.१४"

तरतुद :- रू.४,५५,००,०००/-

यापुर्वीचा खर्च : रू.१,१६,९८,१९७/-

प्रस्तावित खर्च :- रू.४०,२४,७२७/-

एकुण खर्च :- रू.१,५७,२२,९२४/-

शिल्लक :- रू.२,९७,७७,०७६/-

४] कामाची निकड :- सदर भागामध्ये समक्ष पहाणी केली असता सद्यस्थितीमध्ये यापुर्वी सांडपाण्याची व्यवस्था नसल्यामुळे रस्त्यावर मोठया प्रमाणात पाणी साचते,त्यामुळे रस्त्याचे मोठया प्रमाणात नुकसान होते.तसेच नागरीकांच्या सोईसाठी विषयांकीत काम करणे आवश्यक आहे.

५] कामाचा वाव :- १) ४५० एम.एम.व्यासाची पाईप गटर - ५५३ मीटर करणे
२) ९०० एम.एम.व्यासाची पाईप गटर - ९०० मीटर करणे

६] दरसुची :- एम जे पी / सां.बां. वि. २०१९ -२० डी.एस.आर.नुसार

७] प्रस्तावित कामाची आवश्यक मागणी :- सद्यस्थितीमध्ये सदर भागात सांडपाण्याची व्यवस्था खराब झाल्यामुळे नागरीकांच्या सोईसाठी विषयांकीत काम करणे आवश्यक आहे.

तरी रक्कम रूपये रू.४०,२४,७२७/- चे कामास व खर्चास सन २०२१-२२ मधील "विकासभार निधितुन खर्च " या लेखाशिर्षका अंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभापती यांचेकडे पाठविणेस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,

प्रति,

सहाय्यक संचालक,नगररचना विभाग
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्तावित काम "विकासभार निधितुन खर्च " या लेखाशिर्षामधून प्रस्तावित करणेसंबंधी संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.सदर काम "विकासभार निधितुन खर्च " या लेखाशिर्षकातून करता येईल किंवा कसे ? व विषयांकीत काम सदर ठिकाणी करणेकामी आपले अभिप्रायाची आवश्यकता आहे.तरी आपलेकडील अभिप्राय देण्यात यावा.

यावर सहाय्यक संचालक ,नगररचना यांचा अभिप्राय की,विषयांकीत काम हे प्रभाग क्र.७ मधील बोळलेगांव गावठाण ते बिरोबा मंदिर ते सिनानदी दरम्यान १५ मीटर रूंद विकास योजना रस्तयालगत असलेन सदरचे काम करण्यास हरकत नाही.

प्रस्तावा नुसार हरकत नाही.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मा.महापौर यांचे कामाबाबत दि.१३-७-२१ चे पत्र सहाय्यक संचालक नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर सहाय्यक आयुक्त (सा) यांचा अभिप्राय की,शाखा अभियंता यांचे प्रस्तावानुसार सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्रय की,प्रस्तावित अ मा.सहाय्यक संचालक ,नगररचना ,मुलेप,मुलेअ यांचे अभिप्रायानुसार मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

**<u>ऑनलाईन VC चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हापरिषद शाळेपर्यत डी.पी.रोडच्या कडेने ४५० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे व बोल्हेगांव बिरोबा मंदिर ते सिना नदी दरम्यान ४५० व ९०० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हापरिषद शाळेपर्यत डी.पी.रोडच्या कडेने ४५० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे व बोल्हेगांव बिरोबा मंदिर ते सिना नदी दरम्यान ४५० व ९०० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>** :- ऑफिस रिपोर्ट नुसा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हापरिषद शाळेपर्यत डी.पी.रोडच्या कडेने ४५० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे व बोल्हेगांव बिरोबा मंदिर ते सिना नदी दरम्यान ४५० व ९०० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे बाबत च्या ऑफिस रिपार्टास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०७**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक - ९८** **सोमवार दि. २०/०९/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** शिकाउ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आय टी आय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

विषयांकीत विनंती रिपोर्ट सादर की,संदर्भीय अर्जदार हे शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेतील विविध ठिकाणी इलेक्ट्रीशियन,पंप ऑपरंटर व प्लंबर या पदावर काम पहात होते.आमची कामाची मुदत संपुष्टात आलेली असून आम्ही महानगरपालिकेचे मानधन तत्वावर काम करण्यास इच्छुक असून आम्हास मानधन तत्वावर कामावर घेणेची विनंती केलेली आहे.

तसेच आस्थापना कार्या ४/जा.क्र.३००४,३००५ व ३००६ दिनांक २९/११/२०१९ अन्वये कयार्यालयीन आदेश अन्वये शिकाउ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत भरती सन डिसेंबर २०१९ शिकाउ उमोदवार म्हणून इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरंटर व प्लंबर या पदासाठी ६ महिन्यांच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती.व सदरची ६महिन्यांची नेमणूक दि.३०/०६/२०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे.

| अ.नं | कर्मचा-याचे नांव | पदनाम | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री.लखन नवनाथ कर्डीले | इलेक्ट्रीशियन | वसंतटेकडी |
| २ | श्री.सुफियान इस्माईल सय्यद | इलेक्ट्रीशियन | आर.टी.ओ. |
| ३ | श्री.अजिनाथ बाबासाहेब शिंदे | इलेक्ट्रीशियन | विळद पंपींग स्टेशन |
| ४ | श्री.ज्ञानेश्वर झिने | प्लंबर | निर्मलनगर |
| ५ | श्री.भरत पांडुरंग शिंदे | पंप ऑपरेटर | बोल्हेगांव |
| ६ | श्री.विशाल कचरू जोरी | पंप ऑपरेटर | विळद पंपींग स्टेशन |
| ७ | श्री.अभिषेक पुरूषोत्तम गायकवाड | प्लंबर | सारसनगर |
| ८ | श्री. वैभव फसले | इलेक्ट्रीशियन | आगरकर मळा |
| ९ | श्री.किरण पाचारणे | इलेक्ट्रीशियन | विळद पंपींग स्टेशन |
| १० | श्री.महेश दरंदले | इलेक्ट्रीशियन | विळद पंपींग स्टेशन |
| ११ | श्री.सोमनाथ विलास शिंदे | प्लंबर | दिल्लीगेट |

तसेच मागील काही वर्षापासुन सदर पाणी परवठा योजनेसह शहर /उपनगर पाणी वितरण व्यवस्ीतील कार्यरत कर्मचारी मोठया संख्येने कमी झालेले आहेत त्याचा परिणाम शहराच्या दैनंदीन पाणी वितरणावर विपरीत परिणाम हो आहे व कर्मचा-या अभावी वितरण व्यवस्थेची व दुरूस्ती ककामाची अत्यंत गंभर समस्या निर्माण झ ाालेली आहे.अशा परिस्थितीत या विाागाकडून सेवानिवृत्त झालेले व काही अनुभवी कर्मचारी मानधनावर घेवून व त्याच प्रमाणे अय टी आय कडील शिकाउ उमेदार यांचे मदतीन शहर पाणी वितरण व्यवस्था नियंत्रीत करण्याचे कसोशिन प्रयत्न चालू आहेत.त्यातच संदर्थीय नमुद आस्थापना विभागाने दिले एकून ११ शिकाउ उमेदवार/कर्मचारी यांची मुदत संपुष्टात आलेली आहे.वरील सर्व शिकाउ उमेदवार प्रमाणीकपणे काम करत असल्योन सद्यस्थितीत त्यांचे जागी दुसरे पर्यायी कर्मचारी या विभागाकडे उपलब्ध नसल्याने दैनंदीन देखभाल ररूस्तीचे कामत अडचणी निर्माण होणार आहेत.

सद्यस्थितीत वरील नमुद कर्मचारी हे कार्यरत असून व यापुर्वी कामकाज केल्याने व सध्या योजनेवरील अपुरा कर्मचारी वर्ग व कामाची अत्यावश्यकता व निकड पाहता व यापुर्वीचा कामाचा अनुभव लक्षत घेता अशा

प्रकारे आय.टी.आय शिकाउ उमेदवार यांना कंत्राटी पध्दतीने मानधनावर घेतल्यास भ्विष्यात अहमदनगर महानरपालिकेस अडचणी निर्माण वू नया या दृष्टीने सदर प्रकरणी आस्थापना विभागाचा भिप्राय घेवून सदरचा प्रस्तवा मा.स्थायी समिती समोर चर्चे साठी ठेवून मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्ती राहिल .तसेच सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करून कार्योत्तर मंजूरी घेणे उचित राहिल.

यास्तव विषयांकित बाबत अहमदनगर महानगरपालिका शिकाउ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले इलेक्ट्रीशयन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना श्री.लखन नवनाथ कर्डीले व इतर १० यांना कंत्राटी स्वरूपात पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी प्रत्येकी दर महा रूपये १०,०००/- मानधना प्रमाणे नेमणूक करणेस मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्रया की,१.मानधावरील नियुक्ती करतांना सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ /प्र.क्र.४७ /०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ च्या परिपत्रकानुसार सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमांमार्फत करण्याची दक्षता घेण्याबाबत तसेच अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अ स्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या संपुष्टात आणण्याची दक्षता घेण्यात यावी.अशा स्पष्ट सुचना दिलेल्या आहेत.

२.पाणीपुरवठा विभागाने तात्पुरत्या / अ स्थायी नियुक्त्या करतांना उपरोक्त शासन परिपत्रक दि.२५ ऑगस्ट २००५ च्या सुचनेनुसार कार्यवाही करतांना दिसुन येत नाही.

तरी या बाबत दक्षता घेवून तात्पुरत्या मानधनावर नियुक्ती करतांना विहीत मार्गाने / माध्यमामार्फत म्हणजेच वर्तमानपत्रात जाहिरात देवून कार्यवाही अवलंबिणे आवश्यक आहे.

यावर मा.उपयुक्त (कर) यांचा अभिप्राय की,चर्चा करा.

यावर मा.उपयुक्त (कर) यांचा अभिप्राय की, चर्चा केली,मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**<u>ऑनलाईन VC चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- शिकाउ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आय टी आय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.विभाग प्रमुखांनी माहिती दयावी.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- आय.टी.आय चे शिकाउ उमोदवार म्हणून इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरंटर व प्लंबर या पदासाठी ६ महिन्यांच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती.व सदरची ६महिन्यांची नेमणूक संपुष्टात आली असल्याने प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मा.सभापती साहेब :- ठेकेदाराकडून कर्मचारी पुरविण्याचा ठेका मंजूर करण्यात आलेला आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ठेकेदाराकडील कर्मचारी आपण घेणारच आहोत.जर ठेकेदाराकडून कर्मचारी मिळाले नाही.त्या करीता रिपोर्ट मंजूर करून ठेवणार आहोत.

मा.सभापती साहेब :- सध्या कार्यरत असलेले कंत्राटी व मानधनावरील लोक यांना आपण कामावर ठेवणार आहे का किंवा सध्या कार्यरत कर्मचा-यांना ठेकेदारा मार्फत कामावर घेता येईल.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- माझी ठेकेदाराबरोबर चर्चा झाली आहे.जे कर्मचारी चांगले काम करतात त्यांनाच आम्ही घेणार आहोत.या बाबत प्रभागातील नगरसेवकांशी चर्चा करून ठरविणार आहोत.

मा.श्रीमती कुरेशी परवीन :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- शिकाउ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आय टी आय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव** :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका शिकाउ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले इलेक्ट्रीशयन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यापदी श्री.लखन नवनाथ कर्डीले व इतर १० यांना कंत्राटी स्वरूपात पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्रीमती कुरेशी परवीन सही/-

अनुमोदक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थाय समिती
अहमदनगर महागनगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०७**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक - ९९** **सोमवार दि. २०/०९/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालकेच्या शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी श्री.शेख आफाक शेख अजीज व इतर १० यांची मानधनावर नेमणूक करणेस मुदतवाढ मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका

विनंती रिपोर्ट सादर की,अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेसह वितर व्यवस्थेची कर्मचा-यां अळा ावी अत्यंत गंभीर परिस्थिती निमार्ण झालेली आहे.कारण दैनंदिन कामाचे स्वरूप विचारात घेता त्याकरीता असलेला तांत्रिक व अतांत्रिक र्माचारी वर्ग अत्यंत कमी प्रमाणात आहे.त्यामुळे नागरीकांच्या प्राप्त दैनंदिन तक्रारींचा वेळेत निपटारा होत नाही.पर्यायाने शहरासाठी मुळाधरण येथून पाणी उपलब्ध होत आहे.ते पाणी वितरण करीत असतांना काही नागरी भागास गरजेपेक्षा जास्त व काही भागास अत्यल्प पाणी पुरवठा होत आहे.

त्यासाठी शहर पाणी योजनेसह वितरण व्यवस्थेतील सेवानिवत्त / मयत झालेलया कर्मचा-यांच्या जागी नव्याने /पर्या.यी कर्मचारी उपलब्ध करून देण बाबत मा.आयुक्त/ उपायुक्त यांचे मान्यतेने यापूर्वी प्रस्तावातव्दारे आस्थापना विभागाकडे मागणी करण्यात आलेली आहे.परंतु आस्थापना विभागकडून अदयापपर्यत कर्मचारी मिळालेले नाहीत.त्यामुळे पाणी पुरवठा विषयक दैनंदिन तक्रारी वाढत जावून कर्मचा-या अभावी पाणी वितरण व्यवस्थेची व दुरूस्तीची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

त्यासाठी शहर पाणी पुरवठा यिोजनेसह वितरण व्यवस्थेतील सेवानिवृत्त तांत्रिक व अतांत्रिक कर्मचा-यांना मा.आयुक्त यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीची मंजूरी घूवन ६ महिन्याकरीता मानधनावर काम देण्यात येत आहे.

तद्नुसार मा.आयुक्त यांचे दि.१९/०५/२०२० रोजीचे प्रशासकीय मंजूरीने खालील नमुद कर्मचारी यांना मा.स्थायी समितीचे कार्योत्तर मंजूरीस अधीन व राहून तांत्रिक खंड देवून संदर्भ क्र.१ अन्वये आदेशानसुार दि.२०/०३/२०२० पासून ६ महिनया करिता मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती व केलेल्या नियुक्तीस मा.स्थायी समिती,सभा क्र.१ विष्ज्ञय क्र.१५ दि.०८/०४/२०२१ अन्वये पारीत ठरावा नुसार केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी प्राप्त आहे.

संदर्भ क्र.१ अन्वये केलेल्या नेमणूकीची मुदत दि.३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात आलेली असून संदर्भ क्र.३ अन्वये खालील नमुद अनुक्रमे १ ते ११ कर्मचा-यांनी मानधनावरील नेमणूकीस मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

या अनुषांगाने अहवाल सादर की,मानधनावरील नेमणूकीस असलेले खालील नमुद कर्मचारी यांची शहराचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवणेच्या दृष्टीकोनातुन व आस्थापना विभागाकडून नव्याने कर्मचारी उपलब्ध होईपर्यत या विभागास कर्मचा-यांची नितांत आवश्यकता /गरज असल्यामुळे सदरचे कर्मचारी यांचेकडून त्यांचेकडील संदर्भिय नेमणूकीची मुदत संपल्या नंतरही त्यांचेकडून नियमितपणे काम करून घेण्यात येत आहे.व त्याशिवाय या विभागास पर्याय नाही.

तद्नुसार या विभागा मार्फत तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूकीस असलेले परंतु दि.३१/०३/२०२१ रोजी मुदत संपल्यानंतर त्यांचेकडून करून घेत असलेल्या कर्मचा-यांचे नाव तात्पुरत्या स्वरूपातील पदनाम त्यांना अदा करावयाचे दरमहा मानधन व काम करित असलेले ठिकाण इत्यादी बाबतचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | सध्या कार्य रत असलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.दशरथ भागाजी शिंदे | फिटर | १२,०००/- | शहर पाणी पुरवठा योजना मुख्य जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती |
| २ | श्री.रावसाहेब सदाशिव झिने | बिगारी | १०,०००/- | मनपा हद्दीमध्ये पाईप लाईन दुरूस्ती करणे |
| ३ | श्री.गोरख रंगनाथ तेलोरे | विजतंत्री | १२,०००/- | विळद पंपींग स्टेशन,मेंटेनन्स विभाग |
| ४ | श्री.शेख अफाक शेख अजिज | फिटर | १२,०००/- | मनपा शहर व उपनगर हद्दीमधील पाईप लाईन दुरूस्ती व देखभाल |
| ५ | श्री.गागरे साहबराव भागाजी | फिटर, ऑपरेटर/मदतनीस | १०,०००/- | जलशुध्दीकरण केंद्र ,विळद |
| ६ | देविदास माधवराव लेंडकर | पंपऑपरेटर/मदतनीस | १०,०००/- | विळद पंपींग स्टेशन ,पंप ऑपरेटर मदतनीस |
| ७ | श्री.बाळू लक्ष्मण फुलसौंदर | वॉलमन मदतनीस | १०,०००/- | सावेडी भागातील लक्ष्मीनगर ,सुर्यनगर तवलेनगर,इत्यादी परिसराचे दैनंदिन पाणी वाटप |
| ८ | दिपक बाळु खताडे | बिगारी वॉचनम | १०,०००/- | रिझरवायर पाण्याची टाकी येथे वॉचमन |
| ९ | शांताराम माधव पाचारणे | फिटर मदतनीस | १०,०००/- | शहर पाणी परुवठा योजना बोल्हेगांव नागापुर जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती |
| १० | धोंडीराम नामदेव कराळे | पंपऑपरेटर/मदतनीस | १०,०००/- | विळद पंपींग स्टेशन,पंप ऑपरेटर मदतनीस |
| ११ | किशोर विठ्ठल शिंदे | वॉलमन मदतनीस | १०,०००/- | प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत भागाचे दैनंदिन पाणी वाटप नियंत्रीत ठेवणे |

यास्तव कर्मचा-या अभावी पाणी पुरवठा विभागाकडील दैनंदिन पाणी पुरवठया बाबतची निर्माण झालेली गंभर परिस्थिती व त्या साठी कर्मचा-यांची आवश्यकता इत्यादी बाबत वरील नमुद परिस्थितीचे अवलोकन करता वरील तक्त्यातील अनुक्रमे १ ते ११ सेवानिवृत्त कर्मचारी यांना त्यांची पुर्वीची ६ महिन्या करिताची केलेली

नेमणूक संपुष्टात आलेपासून म्हणजेच दि.३१/०३/२०२१ पासून तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणे करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मंजूरीसाठी पाठविणे संयुक्तीक राहिल

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा वरिष्ठ लिपीक,शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्रया की,१.मानधावरील नियुक्ती करतांना सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२०१५ /प्र.क्र.१०० दि.१७डिसेंबर २०१६ मधिल परिच्छेद २(क) (१) नुसार पध्दतीने विविक्षीत कामांसाठी नेमणुका करतांना पारदर्शक पध्दतीच्या अवलंब करण्यात यावा.विहीत पध्दतीने जाहीरात देवून विविक्षित कामासाठी पात्र सेवानिवृत्त अधिका-याकडून अर्ज मागविण्यात यावेत प्राप्त अर्जातुन प्राप्त उमेदवाराची निवड करून नियुक्त्या करण्यात यावी.

तसेच परिच्छेत २ (अ) (७) नुसार करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्तीच्या एकुण कालावधी तीन वर्षा पेक्षा अधिक असणार नाही असे आदेशीत केले आहे. उपरोक्त आदेशाचे पालन करून प्रस्तावित सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या नेमणुकी/ मुदतवाढी बाबत नियमानुसार उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्ताव उशिरा सादर करण्याचे कारण काय?

यावर पाणी पुरवठा लिपीक यांचा अभिप्राय की,फेरसादर, अहमदनगर हशर पाणी पुरवठा विभा ागाकडील सेवानिवृत्ता झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी यांची मानधन तत्वावरील ६ महन्याची मुदत दि.३१/३/२०२१ रोजी संपुष्टात आल्याने त्यांच्या कामाचा अहवाल उशिराने प्रप्त झाल्याने प्राप्त अहवालानुसार त्यांचे ६ महिन्याचे देयके अकौन्ट विभागाकडून प्राप्त करून अदा केलेली आहे.

तद्नंतर सेवानिवृत्त कर्मचारी अनुक्रमे १ ते ११ हयांच्याकडून पुढील ६ महिन्या करीता मुदतवाढीबाबत अहवाल घेवून तातडीने प्रस्तव लिहीण्यास वरील कारणामुळे कालावधी लागला तरी या पुढे हया बाबत तात्काळ निर्णय घेवून प्रस्ताव तयार केला जाईल.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवाल मान्येतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**<u>ऑनलाईन VC चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालकेच्या शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी श्री.शेख आफाक शेख अजीज व इतर १० यांची मानधनावर नेमणूक करणेस मुदतवाढ मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.विभाग प्रमुख माहिती सांगा.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- आपले रूटीनमधील जे कर्मचारी होते त्यांना आपण मानधनावर घेतले आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- एखादा कर्मचारी आपल्याकडे मानधनावर व ठेकेदारकडे सुध्दा आहे हे असे होणार नाही याची दक्षता घ्या.नाहीतर एकाच कर्मचा-याला दोन्ही कडून पगार जातील.

मा.सभापती साहेब :- कर्मचा-यांची नांवे सांगा.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- श्री.दशरथ भागाजी शिंदे, श्री.रावसाहेब सदाशिव झिने, श्री.गोरख रंगनाथ तेलोरे, श्री.शेख अफाक शेख अजिज, श्री.गागरे साहबराव भागाजी, देविदास माधवराव लेंडकर, श्री.बाळू लक्ष्मण फुलसौंदर, दिपक बाळु खताडे, शांताराम माधव पाचारणे, धोंडीराम नामदेव कराळे, किशोर विठ्ठल शिंदे

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- काही भागामध्ये अचानक पाणी बंद होते.पाणी पुरवठा मोठया प्रमाणात विस्कळीत झालेला आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- पाणी साठवण्याची क्षमता कमी आहे.नविन टाक्या पुर्ण होईपर्यत पाणी पुरवठा विस्कळीत राहील.योग्य क्षमतेने साठवण झाल्यास प्रश्न मार्गी लागणार आहे.

मा.सभापती साहेब :- अमृत योजनेचे काम पुर्ण होण्याकरीता किती कालावधी लागणार आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- या योजनेचे ३६ गॅप होते त्यापैकी जवळपास ३५ गॅपचे काम पुर्ण झाले आहे.विळद पर्यत १४०० मीटर लांबीचे काम पुर्णत्वाच्या मार्गावर आहे.काम लवकरच पुर्ण होईल

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालकेच्या शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी श्री.शेख आफाक शेख अजीज व इतर १० यांची मानधनावर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव** :- ऑफस रिपोर्ट नुसारअहमदनगर महानगरपालकेच्या शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले श्री.शेख आफाक शेख अजीज व इतर १० तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.आफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०७**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक - १००** **सोमवार दि. २०/०९/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहार पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले श्री.अमृता भाउ सरोदे व्हॉलमन मदतनिस यांची नव्याने तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक करणे व श्री.वामन बाळकृष्ण नामदेव यांना मुदतवाढ देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की,अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत मुळानगर पंपींग स्टेशन ते वसंत टेकडी दरम्यान कार्यरत शहर पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे विस्तृत स्वरूप व आवश्यकता विचारात घेवून याकामी एकूण १४५ कर्मचा-यांचा आकृतीबंध मंजूर आहे.सन १९९९ ला सदर योजना हस्तांतरणाच्या वेळेस एकुण ११० कर्मचारी योजनेवर हजर झालेले होते.तद्नंतर आज अखेर यापैकी ६८ कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असल्योन फक्त एकूण ३४ कायम कर्मचारी कार्यरत असून ९ कर्मचारी आस्थापना विभ्भागामार्फत मानधनावर नेमणूक केलेली आहे.

शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची कर्मचा-यां अभावी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.कारण वितरण व्यवस्थेचे कामाचे स्वरूप विचारात घेता त्याकरीता असेलेला तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी वर्ग अत्यंत कमी प्रमाणात आहे.त्यामुळे नागरीकांच्या प्राप्त दैनंदिन तक्रारींचा वेळेत निपटारा होत नाही.पर्यायाने शहरासाठी मुळाधरण येथून पाणी उपलब्ध होत आहे.ते पाणी वितरण करीत असतांना काही नगारी भागास गरजेपेक्षा जास्त व काही भागास अत्यंल्प पाणी पुरवठा होत आहे.

त्यासाठी शहर पाणी योजनेसह वितरण व्यवस्थेतील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या जागी नव्याने /पर्यायी कर्मचारी उपलब्ध करून घेणे बाबत मा.आयुक्त/मा.उपायुक्त यांचे मान्यतेने यापुर्वी प्रस्तावाव्दारे आस्थापना विभागाकडे मागणी करण्यात आलेली आहे.परंतु आस्थापना विभागाकडून अद्यापपर्यत कर्मचारी मिळालेले नाहीत.त्यामुळे पाणी पुरवठा विषयक दैनंदिन तक्रारी वाढत जावून कर्मचा-यां अभावी पाणी वितरण व्यवस्थेची व दुरूस्तीची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

या अनुषंगाने खालील तक्त्यात नमुद कर्मचारी अ.नं.१ ते १४ हे महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले असून त्यामधील अ.नं.१ चे कर्मचारी वगळता सर्व कर्मचारी सध्या मानधनावर कार्यरत असून अ.नं.१ ते १४ चे कर्मचारी या सर्व कर्मचा-यांनी इकडेस कामावर घेणे बाबत विनंती असून पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी प्रस्ताव सादर करणे बाबत आदेशीत केलेले आहे.

सदर अ.नं.१ चे कर्मचारी हे सेवानिवृत्त असून त्यांनी यापुर्वी व्हॉलमन मदतनिसाचे काम केलेले आहे.अ.नं.२ चे कर्मचारी यांची सेवा दि.३१/१२/२०२० रोजी संपुष्टात आलेली असून पुन्हा नव्याने देण्यात येणारे मानधन व प्रत्यक्ष काम करण्याचे ठिकाण खाली प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | सध्या कार्यरत असलेले व नव्याने रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.अमृता भाउ सरोदे | बिगारी | १०,०००/- | प्रभाग समिती क्र.४ बरूडगांव रोड |
| २ | श्री.वामन बाळकृष्ण नामदेव | बिगारी | १०,०००/- | पाणी पुरवठा विभाग मुख्यालय |

करीता महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा विभागा करीता कायम स्वरूपी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होईपर्य त पाणी पुरवठा विभागा कडील कामाचा अनुभव असलेले व महानगरपालिका सेवूतून निवृत्त झालेले १) श्री.अमृता भाउ सरोदे २) श्री.वामन बाळकृष्ण नामदेव वॉचमन /बिगारी यांची पाणी पुरवठा विभागाकडे

तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी दर महा मानधाव किमान रू.१०,०००/- प्रमाणे नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे संयुक्तीक राहील.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.शासन ,सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.संकीर्ण २७१५प्र.क्र.१०० दि.१७ डिसेंबर २०१६ मधिल परिच्छेद २ (क) (१) करार पध्दतीने कामांसाठी नेमणुका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा विहीत पध्दतीने जाहिरात देवून कामा साठी सेवानिवत्त अधिका-याकडून अर्ज मागविण्यात यावेत प्राप्त अर्नतुन पात्र उमेदववरांची निवड करून नियुक्ती करण्यात यावी तसेच परिच्छेद -२ (अ) (७) नुसार करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्तीच्या एकुण कालावधी तीन वर्षा पेक्षा अधिक असणार नाही असे आदेशित केलेले आहेत.उपरोक्त आदेशाचे पालन करून प्रस्तावील सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या नेमणुक/मुदतवाढीबाबत विभागाला उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्ताव उशिरा सादर करण्याची कारण काय?

यावर पाणी पुरवठा लिपीक यांचा अभिप्राय की,फेरसादर अ.क्र.१ सेवानिवृत्त कर्मचारी श्री.अमृत्ता भाउ सरोदे हे प्रभाग समिती क्र.४ बरुडगांव रोड हया कार्यालयामधील पाणी पु.विभागामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी श्री.अमृता भाउ सरोदे हे माहे जुन दि.३०/०६/२०२१ रोजी सेवानिवृत्त झाल्याने नव्याने त्यांची नेमणूक करावयाची असल्याने त्यांची नेमणूक मानधन तत्वावर घ्यावे कि नव्याने मंजूर होत लेबर कॉन्ट्रक्टर व्दारा नेमणूक करावयाची हया बाबत विचार विनिमय करण्यात काहिसा कालावधी लागल्याने त्यामुळै प्रस्ताव ठेवण्यास काहिसा वेळ लागला तर यापुढे या बाबत तात्काळ दखल घेण्यात येईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**<u>ऑनलाईन VC चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहार पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले श्री.अमृता भाउ सरोदे व्हॉलमन मदतनिस यांची नव्याने तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक करणे व श्री.वामन बाळकृष्ण नामदेव यांना मुदतवाढ देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहार पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले श्री.अमृता भाउ सरोदे व्हॉलमन मदतनिस यांची नव्याने तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूकीस तसेच श्री.वामन बाळकृष्ण नामदेव यांना तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>** :- अहमदनगर शहार पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले श्री.अमृता भाउ सरोदे व्हॉलमन मदतनिस यांची नव्याने तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूकीस तसेच श्री.वामन बाळकृष्ण नामदेव यांना तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>सभापती<br>स्थायी समिती<br>अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०७**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक - १०१** **सोमवार दि. २०/०९/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** कोविड - १९ लसीकरणा करीता म.न.पा.आरोग्य केंद्र येथे मंडप ,बॅरीकेट,खुर्ची व टेबल यांची व्यवस्था करणे,मायक्रो कंटेनमेंट झोन मध्ये बॅरेकेटींग करणे इत्यादी कामाकरीता निविदेपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

संदर्भ :- १.इकडील कार्यारंभ आदेश जा.क्र.७० दिनांक २५/०१/२०२१
२.जा.नं.साप्रवि/पी.ए./आयुक्त कार्यालय २५५४ दिनांक १३/३/२०२१ चे आदेश
३.आरोग्य विभाग जा.क्र.९४ दिनांक १०/४/२०२१चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रान्वये सादर की,अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कारोनाचा वाढता प्रार्दुभाव विचारात घेता कोरोना विषाणु वाढीस प्रतिबंध करण्याचे दृष्टीने तातडीने उपाययोना करणे आवश्यक आहे त्या करीता मोठया प्रमाणात कोरोना रूग्ण आढळुन आलेल्या क्षेत्रामध्ये कोविड- १९ विषाणुच्या प्रार्दुभावामुळे शहरात व उपनगरात मायक्रो कंटेनमेंट झोन तयार करून हॉटस्पॉट परिसरात पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून आवश्यकतेनुसार बॅरेकेटींग करणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी असे संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये मा.आयुक्त यांनी आदेशीत केली होती.त्यानुसार आवश्यतुेनसार शहरात व उपनगरात हॉटस्पॉट परिसरात क्षेत्र घोषीत केलेनुसार आवश्यकतेप्रमाणे बॅरेकेटींग करण्यात आले होते.

तसेच संदर्भ क्र.३ अन्वये महानगरपालिकेच्या ७ नागरी आरोग्य केंद्र व आरोग्य विभाग जुनी महानगरपालिका येथे महानगरपालिके मार्फत लसीकरण मोहिम सुरू आहे.तसेच लसीकरण करण्यासाठी आलेल्या नागरीकांना बसण्यासाठी प्रतिक्षा गृहाची आवश्यकता असल्याने ७ नागरी आरोग्य केंद्र व आरोग्य विभाग जुनी महानगरपालिका या ठिकाणी पत्रा मंडप,खुर्ची व बॅरेकेटींची व्यवस्था करण्यास यावी असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी ,अहमदनगर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

त्यानुसार सन २०२०-२०२१ वर्षाकरीता मंडप उभारणे व रंगरंगोटी या लेखाशिर्षका अंतर्गत मंडप बॅरेकेटींची ई - निविदा मागवून कैलास लाईट ऑण्ड मंडप डेकोरेटरर्स ,अहमदनगर यांना संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले होते त्यानुसार वरील कामे करून घेण्यात आलेली आहेत.सदर कामाची वार्षीक निविदा रक्कम रू.२५,००,०००/- इतक्या रकमेची होती.सदर निविदा पुढील वर्षाची निविदा मंजुर होईपर्यत ग्राह्य धरण्यात येतील असे कार्यादेशामध्ये उल्लेख आहे.

कोरोनाचा वाढता प्रार्दुरभाव लक्षात घेता निविदेपेक्षा जादा खर्च झालेला आहे.वाढीत झालेला खर्च खालील प्रमाणे

| अ.नं. | कामाचा तपशिल | बिलाची रक्कम | लेखाशिर्षक |
|---|---|---|---|
| १ | शहर व उपनगरातील कंटेनमेंट झोन बॅरेकेटींग करणे | १५,५२,५८३/-<br>४,४४,४१६/-<br>१९,९६,९९९/- | आरोग्य विभागाकडील एस.डी.आर.फंड (कोविड-१९) |
| २ | म.न.पा.दवाखाने येथे लसिकरणाकरिता पत्रा ,मंडप व बॅरेकेटींक,टेबल,खुर्ची,शामीयाना व इतर व्यवस्था करणे दि.०८/०४/२०२१ पासुन २१/०६/२०२१ पर्यत | २५,३३,४३७/-<br>१९,६५,७२३/-<br>३२,००,०१०/-<br>७६,९९,१७०/- | एस.डी.आर.फंड (कोविड-१९) |

सन २०२१ करीता कंटेनमेंट झोन करीता बॅरेकेटींग करणे करीता १९,९६,९९९/- इतका खर्च झालेला आहे व म.न.पा.दवाखाने येथे लसीकरणाकरीता पत्रा मंडप व बॅरेकेटींग,टेबल,खुर्ची,शामीयाना व इतर व्यवस्था करणे या कामाकरीता दि.८/४/२०२१ पासुन २१/६/२०२१पर्यंत ७६,९९,१७०/- इतका खर्च झालेला आहे व दिनांक २२/६/२०२१ पासुन पुढील देयक अद्याप प्राप्त झालेली नाहीत त्यामुळे सदर बिले देणे बाकी आहे.

सन २०२०-२०२१ ची निविदा मागविण्यात आलेली आहे.परंतु सदरची निविदा मंजुरी स्तरावर आहे.त्यामुळे सन २०२०-२०२१ ची निविदा रक्कम रूपये २५,००,०००/- इतकी आहे.म्हणजे निविदा रकमेपेक्षा रक्कम रू.७१,९६,१६९/- इतका खर्च आजपर्यंत जादा झालेला आहे व यापुढील देयक अद्याप प्राप्त झालेली नाहीत तसेच या पुढील प्राप्त होणारे देयके अदा करणेस वाढीव खर्च होणार आहे.

तरी निविदा मंजुरीपेक्षा जादा झालेल्या व होणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता व उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,शाखा अभियंता,उपअभियंता व शहर अभियंता यांचे प्रस्तावानुार अ प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे मा.स्थायी समितीची मंजुरी घेण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,चर्चा करा.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,चर्चा केली ,आवश्यकतेनुसार ठेवून उर्वरित मंडप काढून टाकावेत व सदर ठिकाणी पत्र्याचे शेड साठी एस्टीमेंट सादर करा.

प्रस्तावामध्ये अ प्रमाणे मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर सादर करणेस मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**<u>ऑनलाईन VC चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- कोविड - १९ लसीकरणा करीता म.न.पा.आरोग्य केंद्र येथे मंडप ,बॅरीकेट,खुर्ची व टेबल यांची व्यवस्था करणे,मायक्रो कंटेनमेंट झोन मध्ये बॅरेकेटींग करणे इत्यादी कामाकरीता निविदेपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- या प्रस्तावाची माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.इथापे :- महानगरपालिकेच्या ७ नागरी आरोग्य केंद्र व आरोग्य विभाग जुनी महानगरपालिका येथे महानगरपालिके मार्फत लसीकरण मोहिम सुरू आहे.तसेच लसीकरण करण्यासाठी आलेल्या नागरीकांना बसण्यासाठी प्रतिक्षा गृहाची आवश्यकता असल्याने ७ नागरी आरोग्य केंद्र व आरोग्य विभाग जुनी महानगरपालिका या ठिकाणी पत्रा मंडप,खुर्ची व बॅरेकेटींची व्यवस्था करण्यास जादा आलेल्या खर्चास मान्यता मिळणे बाबतचा विषय स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कोविड - १९ लसीकरणा करीता म.न.पा.आरोग्य केंद्र येथे मंडप ,बॅरीकेट,खुर्ची व टेबल यांची व्यवस्था करणे,मायक्रो कंटेनमेंट झोन मध्ये बॅरेकेटींग करणे इत्यादी कामाकरीता निविदेपेक्षा जादा झालेल्या खर्चास व होणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कोविड - १९ लसीकरणा करीता म.न.पा.आरोग्य केंद्र येथे मंडप ,बॅरीकेट,खुर्ची व टेबल यांची व्यवस्था करणे,मायक्रो कंटेनमेंट झोन मध्ये बॅरेकेटींग करणे इत्यादी कामाकरीता वार्षीक निविदा कार कैलास लाईट ऑण्ड मंडप डेकोरेटरर्स ,अहमदनगर यांच्या निविदेपेक्षा जादा झालेल्या खर्चास व यापुढील देयक अद्याप प्राप्त झालेली नाहीत तसेच या पुढील प्राप्त होणारे देयके अदा करणेस वाढीव होणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०७**
**(ऑनलाईन झुम अॅप व्दारे)**

**विषय क्रमांक - १०२** **सोमवार दि. २०/०९/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ता धारक श्री.किशोर दत्तात्रय काळे रा.आयोध्या नगर,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१ सावेडी वॉर्ड क्र.७८ बील क्र.Z१७८०७२३४० (७८-२६९) वरील नळजोड नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रभाग समिती क्र.१ सावेडी उपविभागीय कार्यालय.

सावेडी प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.७८ वसुली मदतनीस यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.७८ विल क्र.२६९ चे मिळकतधारक श्री.किशोर दत्तात्रय काळे रा.आयोध्यानगर यांच्या मालकीचे घर क्रमांक १० ब असे असुन त्यांनी अर्जात नमुद केले आहेकी,माझ्या घराला नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीची आकारणकी केलेल आहे तरी सदरची आकारणी केलेली पाणीपट्टी शास्तीसह निर्लेखित करण्यात यावी हि विनंती.

आज रोजी समक्ष पाहणी केली असता घर क्र.१० ब श्री.किशोर दत्तात्रय काळे यांचे मालकीचे असून सदर ठिकाणी नळजोड कनेक्शन दिसुन येत नाही तसेच पाणीपरुरवठा विभागात नळजोड आहे किंवा नाही याबाबत पाणीपुरवठा फिटर यांचा समक्ष स्थळ पहाणी अहवाल प्राप्त करून घेण्यासाठी पाठविला असता पाणीपुरवठा विभागाकडून दि.२/३/२०१६ रोजी पाणीपुरवठा फिटर यांनी सदरील घरावर नळ जोडणी आढळुन येत नाही याबाबतचा अहवाल दिला आहे.मालमत्ताधारक यांनी सन २०१५-२०१६ अखेर रू.३७५२३/- इतकी बाकी होती त्यापैकी त्यांनी रक्कम रूपये २१०२३/- घरपट्टी कराचा भरणा केला आहे.सदर पाणीपट्टी कराची रक्कम रूपये १६५००/- सन २०१५-२०१६ अखेर दंडात्मक कराची रक्कम वसुल न होण्याजोगी शास्तीसह थकबाकी रूपये १६५००/- असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील उक्त तरतुदीनुसार प्रकरण ८ अनुसुची ड कराधान नियम २०(१) मधील ड नुसार सदरची आकारणी अभिवितपणे किंवा चुकीने करण्यात आलेली असल्याने वरील नियमानुसार दुरूस्ती करण्याबाबत प्रस्ताव योग्यते मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वॉर्ड क्र.७८ चे वसुली मदतनिस व म्युनिसीपल फिटर यांच्या दि.२/३/२०१६ च्या अहवालानुसार मालमत्ता धारक श्री.किशोर दत्तात्रय काळे यांना नळजोड नसताना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम रूपये १६५००/-सन २०१५-१६अखेर कमी करणे योग्य वाटते तथापी पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,नळजोड नसतांना पाणीपट्टीची आकारणी झालेली होती.नळजोड प्रत्यक्षात नसल्याने त्याची रक्कम वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र मनपा अधिनियमाती कलम १५२ नुसार रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठवा सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन VC चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ता धारक श्री.किशोर दत्तात्रय काळे रा.आयोध्या नगर,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१ सावेडी वॉर्ड क्र.८७ बील क्र.Z१७८०७२३४० (७८-२६९) वरील नळजोड नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ता धारक श्री.किशोर दत्तात्रय काळे रा.आयोध्या नगर,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१ सावेडी वॉर्ड क्र.८७ बील क्र.z१७८०७२३४० (७८-२६९) वरील नळजोड नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टची रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>** :- ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार मालमत्ता धारक श्री.किशोर दत्तात्रय काळे रा.आयोध्या नगर,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१ सावेडी वॉर्ड क्र.८७ बील क्र.z१७८०७२३४० (७८-२६९) वरील नळजोड नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टची रक्कम निर्लेखित करणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०७**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक - १०३** **सोमवार दि. २०/०९/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ता धारक श्री अशोक वामन पाटेकर रा.पाईल लाईन हडको वसाहत,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१,वॉर्ड क्र.६२ बिल क्र.z १६२०६५५९२(६२-२५२) वरील दुबार आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

उपरोक्त विषयांन्वये सावेडी वसुली विभागातील वॉर्ड क्रमांक ६२ चे वसुली लिपीक यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.६२ मधिल मालमत्ता क्र.(६२-२५०) Z १६२०६५५९१ वरील मालमत्ताधारक अशोक वामन पाटेकर घर क्र.३२/२५२ व ३२/२५३ पा.ला.हडको वसाहत ,सावेडी अहमदनगर यांनी घर क्र.३२/२५३ वरील पाणीपट्टी कमी करून दुरूस्त बिल मिळणेबाबत दि.१८/१२/२०१९ रोजी लेखी अर्जाव्दारे कळविले आहे.

वसुली लिपीक यांनी अर्जादार यांच्या अर्जावरीन वसुली अभिलेखाची पडताळेणी केली असता वॉर्ड क्र.६२ मध्ये मालमत्ता z १६२०६५५९१ (६२-२५०) z १६२०६५५९२(६२-२५१) वर भोगवटदार अशोक वामन पाटेकर अशी नोंद असुन दोन्ही बिलावर १/२" पिण्याकरीता नळाची नोंद असल्याचे निदर्शनास आले आहे.

वसुली लिपीक यांनी समक्ष जागेची दि.२८/०५/२०२० रोजी स्थळ पाहणी केली असता भोगवटदार अशोक वामन पाटेकर हे पाईपलाईन हडको वसाहत मधिल मालमत्ता क्र. z १६२०६५५९२(६२-२५१) वरील घर क्रमोक २५३ हे या दोन्ही घराचा एकत्रित वापर करता असून घर क्र.२५२ वर एकच नळ कनेक्शनची नोंद असल्याचे निदर्शनास आले आहे.तसेच अहमदनगर महानगरपालिका सावेडी पाणीपुरवठा विभागातील पाणी पुरवठा फिटर यांनी मालमत्ता क्र. z १६२०६५५९२(६२-२५१) वर नळजोड नसल्याबाबतचा दि.२९/०५/२०२० रोजी लेखी अहवाल दिला असुन सदरचा अहवाल सोबत जोडला आहे.

तरी अर्जदार यांच्या अर्जानुसार मालमत्ता क्र. z १६२०६५५९२(६२-२५१) वरील आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम २६,३१८/- व त्यावरील शास्तीची रक्कम ३९,००८/- अशी एकुण ६५,३२६/- संपुर्ण रक्कम निर्लेखित करून मालमत्ता क्र. z १६२०६५५९२(६२-२५१) कायमस्वरूपी रद्द करणेबाबत अहवाल मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार वसुली वॉर्ड क्र.६२ मधील मालमत्ताधारक श्री.अशोक वामन पाटेकर यांच्या नोवे बिल क्र.२५० व २५१ सादर कालमत्तेची नोंद आहे.त्यापैकी बिल क्र.२५१ यावर नळकनेक्शन नसल्या बाबत मनपा फिटर यांनी अहवाल दिला असल्याने बिल क्र.२५१ यावर असलेली पाणीपट्टी व घरपट्टी रक्कम शास्तीसह कमी करून बिल रद्द करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

सावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार ,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच म्यु.फिटर यांचा अहवालानुसार डबल नोंद कमी करणे उचित वाटते.

यावर रिव्हिजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,सदर प्रकरणी मिळकत धारक यांचे दोन मिळकतीचे एकत्रीकरण केलेले असल्याने मिळकतीचे एकच बिल देण्यात येते.पाणीपुरवठा फिटर यांचे पाहणी अहवालानुसार सदर इमारतीमध्ये १ नळकनेक्शन आहे.तरी बील क्र.२५१ वर असेलेली पाणीपट्टी व घरपट्टीची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती यांचे कडे सदरची रक्कम निर्लेखित करणेसाठी पाठविणेस हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समितीकडे निर्लेखित करणेसाठी मान्यतेस सादर.
यावर मा.उपायुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**<u>ऑनलाईन VC चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ता धारक श्री अशोक वामन पाटेकर रा.पाईल लाईन हडको वसाहत,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१,वॉर्ड क्र.६२ बिल क्र.z १६२०६५५९२(६२-२५२) वरील दुबार आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ता धारक श्री अशोक वामन पाटेकर रा.पाईल लाईन हडको वसाहत,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१,वॉर्ड क्र.६२ बिल क्र.z १६२०६५५९२(६२-२५२) वरील दुबार आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>** :- ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार मालमत्ता धारक श्री अशोक वामन पाटेकर रा.पाईल लाईन हडको वसाहत,सावेडी ,अ.नगर प्र.स.क्र.१,वॉर्ड क्र.६२ बिल क्र.z १६२०६५५९२(६२-२५२) वरील दुबार आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका